क्र. १०८५

४९५१

# नॅशनल लॉन्ड्री

२ च पैशांत व ४ दिवसांत
कपडे धुवून मिळतील.

पत्ता—लिमये महाराजांसमोर,
[illegible] ीजवळ, पुणें.

प्रो [illegible] लेले.

REFBK-0004951

REFBK-0004951

---

आर. एन्. [illegible] टोबॅको निस्ट,
ॲन्ड जनरल मर्चंट, ६८८ शुक्रवार, पुणें.

तंबाकू, जर्दा, तपकीर (केवडा, लीला, कमला, कस्तुरी) काळी, पिवळी वगैरे माल.

व्यापाऱ्यांना भरपूर कमिशन.

मिळण्याचे एकच ठिकाणः—

आर. एन्. गोडबोले,
ग्लोब सिनेमासमोर, पुणें.

# शाहीर–परिचय

प्रस्तुत पोवाड्याचे शाहीर श्री. बापूराव तिडके, मु. वडूज जि. सातारा हे असून, ते " भारद्वाज " या टोपण नांवानें 'महाराष्ट्र साहित्यांत' आधूनमधून फेरफटका मारीत असतात ! मात्र तसें करितांना त्यांची निरीक्षणदृष्टी ही " कांसवी " बनते आणि केलेल्या फेरफटक्यांतून प्रस्तुत सारखा खमंग खुसखुशींत फटका, निर्माण होऊन तो वाचकांच्या पाठीवर न बसतां बुद्धीवर बसतो ! श्री. तिडके हे पुणें येथें इंजीनिअर कॉलेजच्या डिप्लोमा क्लासला असल्यानें फटक्यांतल्या प्रत्येक चरणांतला अर्थ पुणेंकर रसीकांना परिचित आहेच ! आणि ज्याअर्थी श्री. बापूराव हे विद्यार्जना करितां म्हणून पुण्यनगरींत राहिले होते त्याअर्थी त्यांची कांसवीदृष्टी पुण्याच्या वातावरणांत बरीच संमिश्रित बनलेली दिसते ! अर्थात् त्यांचा हा स्वानुभवाचा उपदेश मोठ्या मोलाचा ठरून, पुण्यांत विद्यार्जनाकरितां येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मार्गदर्शक असा हा फटका तयार झाला ! रामदासांनीं मनाचे श्लोक केले आपल्या मनाकरितां !–पण आज ते मनोमय पटतात जगाला ! तसेंच, श्री. बापूराव ह्यांच्या या फटक्याचें झालें आहे ! मोहक मोहीमेंत मनाची चलबिचल न होऊं देतां, आत्मसंयमन करण्याकरितां म्हणून शाहीराला आपली विवेकबुद्धी बरीच जागृत ठेवावी लागली आणि म्हणूनच हा उपदेशपर फटका बहकलेल्या विद्यार्थ्यांच्या बुद्धिमांद्यावर रामबाण उपाय म्हणून त्यांच्या काव्यशक्तींतून बाहेर पडला ! तो जसा पडला तसाच " सूर्यकांत " मासिकानें त्याला उजेडांत आणला ! परंतु आतां त्याची उपयुक्तता अधिक वाटल्यानें, आणि गणेशोत्सव जवळ आल्यानें कित्येक वाचकांच्या आग्रहावरून तो पुनर्मुद्रित करणें आवश्य झालें आहे ! फटक्यांतले एकंदर बोधपर तडाखे पाहून ते यावेळीं जेवढें उडवावेंत तेवढें अपुरेंच पडणार आहेत असें मला वाटतें !

६७९ (अ.)<br>सदाशिव, पुणें नं. २ } विठ्ठल नारायण कोठीवाले,

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पुण्यास गेल्यावर | कवि श्री० बापूराव तिडके. |
| २ | मिय्या और बिब्बी | कवि श्री० शुर्पणखानाथ. |
| ३ | हे चुंबन राणी | कवि श्री० मदनमस्त. |
| ४ | वंचेनाचा जोडा, | कवि श्री० बगदादनो बुलबुल. |
| ५ | संगीत श्रीमुखांत, | कवि श्री० माधुरी मधुकरी. |
| ६ | फासावर चढला गुप्त, | कवि श्री० दोरावजी सोरावजी. |
| ७ | अंधारांतला भाला, | कवि श्री० लॉ क्लासवाला. |
| ८ | फेकला तटाहुन जोडा. | कवियत्री सौ० परदेशी थिवारी. |
| ९ | मज नको ग आय्. सी. एस्, | कवियत्री सौ० मालतीबाई मायगॉड |



प्रकाशक,

श्री० गोपाळ नरहर नातू, ३२५ y सदाशिव पेठ,

अशोकव्हिला, पुणें.

मुद्रक,

गणपत महादेव नलावडे,

नारायण छापखाना, १६ बुधवार, पुणें.


## राहूकेतू मंडळातील सदस्य

| | | |
|---|---|---|
| १ | श्री० शुर्पणखानाथ, | ( मॉर्निंग इनस्पेक्टर, पुणें.) |
| २ | मदनमस्त, | ( जनाना सुपरवायझर, हैद्राबाद.) |
| ३ | बगदाद नो बुलबुल, | ( बदामपिस्ता मर्चंट, कंदाहर.) |
| ४ | सौ० माधुरी मधुकरी, | (ड्रेसमेकर, 'परकर' स्पेशालिस्ट, कोल्हापूर.) |
| ५ | श्री० दोरावजी सोरावजी | ( चायवाला, पुणें.) |
| ६ | श्री० लॉ क्लासवाला, | (भोजन स्पेशालिस्ट, पुणें.) |
| ७ | सौ० परदेशी थिवारी, | (फिमेल बार्बर, तासगांव.) |
| ८ | सौ० मालतीबाई मायगॉड, | (M. A. D. कैलासवासा.) |

# पुण्यांत गेल्यावर—

[पुण्यास प्रथमच जाणाऱ्या आणि तेंही पण फर्ग्यूसन कॉलेजांत शिकावयास जाणाऱ्या आपल्या एकुलत्या एक लाडक्या चिरंजिवास, त्याच्या अनुभविक वडिलांच्या अंगांत अनंत फंदांचा संचार होऊन त्यांनीं पुढीलप्रमाणें प्रेमाचा आणि कळकळीचा उपदेश केला तर तो अयोग्य होईल कां ?]

## फटका *

राजमार्ग जो 'कॉलेजाला' त्याच्या विन तूं जाउं नको
'कॅनाल'वरुनी-आडवाजुनें-त्या वाटेचें नांव नको
खांबामागें, दाराजवळीं, फार पुढें तूं बसूं नको
अगदीं मागें, दूर बसूनी झोंप कधीं तूं घेउं नको
दिवस रात्रिचा रात्र दिसाची करुनी बाळा! झोपुं नको
तासाला मग आळस करुनी 'बुट्टी' कधिंही देउं नको
उगवल्या ज्या पुरत्या न ऐशा 'छाट' मिशाला देउं नको
दिवसामधुनी दोन वेळ तूं अथवा दाढी करूं नको
'छबी' दिसावी 'गोंडस' अपुली ध्यास बायकी हा न धरी
'फेस पॉवडर' अथवा 'स्नो'[1]चा मारा करूं नको मुखावरी
लांब लांबही केंस ठेवुनी उफराटे ते वळवोनी
'पोलोकॉलर' ती कोटावर कंठहि उघडा ठेवोनी
'डबल ब्रेस्टचा' तो 'ब्लेझरचा' कोट[2] त्यावरी घालोनी

---

* ही चालच आहे.

१ विशेषतः 'अफगाण स्नो'!

२ 'ॲस्क्विथ ॲंड लॉर्ड' कंपनींत शिवलेला—

शुभ्र सैल अन् पाय घोळही विजार[1] सुंदर चढवोनी
डोक्यावरति टोपी न ठेउनि कोठें कधींही भटकुं नको
'रुबाब' ऐसा करुनी आणी वर्गामध्यें जाउं नको
'जरा बिघडलें डोळे माझे' असा बहाणा करूं नको
डोळ्यावरती ऐटदार तो उगाच चष्मा ठेउं नको
वरिल खिशामधिं दिसेल दुसऱ्या हातरुमाल न ठेवि असा
'तिनें'[2] दिला मज थापा सुंदर मारुं नको तूं कधीं अशा
'मायबोलिच्या' अभिमानास्तव वाङ्मय मंडळ स्थापुं नको
सांगायासी तत्त्वें आपुलीं 'चपलालीला[3]' गाठुं नको
चातकवृत्ति धरुनि वाट तूं 'गॅदरिंगची' पाहूं नको
अथवा होउनि तूं 'स्त्री पार्टी' लुगडें कधिंही नेसुं नको
सहज मुलीनें कुणीं पाहिलें, कुणीं बोललीं, कुणि हंसली
नको प्रीतीची शंका घेऊं 'अन्रोमॅन्टिक' जरि वदली
'तास कुणाचा आतां आहे?' कुणां मुलीला पुसूं नको
उत्तर सरळें[4] नाहीं आलें म्हणुनी वरती चिडूं नको
अन्त पहाया खोल प्रीतिचा पत्र कुठें तूं टाकुं नको
उत्तर कां नच आलें? म्हणुनी स्वतःच जाऊनि भेटुं नको
हास्य कुणाचें, रंग कुणाचा यावर दृष्टी ठेवु नको
उगीच ऊसासे टाकुनि अपुल्या व्यर्थ मानसीं झुरूं नको
'ती' कोठुनिया येते अथवा जाते कोठें एकटिच
पाळत ठेऊनि तिचिया मागें जाऊ नको तूं कधिं हळुच

---

१ कमींत कमी दीडफूट रुंदीची बाही असलेला चोळणा!

२ 'तिनें' हा शब्द येथे पत्नीवाचक नाहीं!

३ हा 'जोडा'क्षर विरहित जोडशब्द चप्पलेसमान असणारी लीला याअर्थीं वापरलेला नसून चंचल वृत्तीची-अतएव विद्यार्थिनी (बहुधा अनेकवचनीच-) अशा अर्थीं त्याचा उपयोग केला आहे. अर्थाचे बाबतींत यापेक्षां जास्त 'चांभार' चौकशींत पडूं नये.

४ केवळ प्रासासाठींच 'सरळ' शब्दाचा हा फरक!

एकच कविता प्रेमावरि ती रचुनि 'मासिका'[1] धाडुं नको
कवी ! कवी ! तुज 'त्यांनि'[2] म्हणावें म्हणुनी वेडा होउं नको
कुठें ? कुणाचे ? कसें ? कुणावर ? प्रेमचौकशी करूं नको
'कॉलेजांतिल' या प्रेमाच्या फंदामध्यें पडूं नको
तुकडे खडुचे खिशांत ठेउनि कुणा मुलीवर फेकु नको
कुठें भिंतिवर वा बांकावर 'लेख'[3] कांहीं तूं लिहूं नको
'छकडा' 'आबा' आणि 'ग्यानबा' म्हणुनि कुणाला हिणवुं नको
'आहेब्बुवा ऽ ऽ' हा मंत्र मुखांतुनि केव्हांही तूं काढुं नको
कोटी करुनी अश्लिल काहीं 'इंप्रेशन्' तूं मारूं नको
'स्टॅम्पिंग' करुनी उगिच आपुल्या पदकमलांना शिणवुं नको
दर रविवारीं 'फीस्ट' म्हणूनी 'गेस्ट' कधीं तूं जमवुं नको
खर्च वाढला म्हणुनी 'खाडे' करुनि उपाशी राहुं नको
जागरणाची अभ्यासाची वात कधीं तूं ठोकुं नको
मला समजतें यांतिल इंगित एकवेळ तूं जेऊं नको
केवळ वायू भक्षुनि योगी वसे तपाला जसा पहा
तैसा काधिंमाधिं तूं अभ्यासा न करी प्राशुनि 'स्टॉंग चहा'
पश्चिम भागीं नान्दे 'लेमॉस'[4] 'आगाखानही'[5] पूर्वेला
रुसले तुजवरि मुलीं न चिन्ता ! नको जाउं तूं भेटीला
जिकडें तिकडें असें उसळलें राष्ट्रप्रेम या कालाला
'महाराष्ट्र भुवनांत' जाउनी नच दावी त्या प्रेमाला
तुला सांगतों कानामध्यें अगदीं अगदीं विसरुं नको
'आम्लेट' 'आम्लेट' ज्याला म्हणती त्याला चुकुनि शिवूं नको
'पानपट्टि विडि काडी माचिस' दुरुनि देखिल पाहुं नको

१ कॉलेज मॅगेझिन.


२ 'तिनें' याचें अनेकवचन.

३ हे लेख सर्वांना परिचित आहेत.

४ याची माहिती फर्ग्यूसन रोडवरच्या कोणाही विद्यार्थ्याला विचारावी.

५ मेडिकल स्टूडंटस् माहिती सांगतील.

'पार्सिग्शोची' सहज म्हणूनी 'टेस्ट' कधीं तूं घेउं नको
'ग्लोब, अपोलो, आर्यन, वेस्टेन्ड, एंपायर वा श्रीकृष्णा'
जरी एकदां जाशिल त्यांना असह्य होईल तव तृष्णा
'विजयानंद' नि 'किर्लोस्कर' हीं थिएटरें बा ! ओस पडो
'गंधर्वांवरि' 'ललितकलेवरि' त्वदीय प्रीती कधिं न जडो



नवरात्रामधिं सायंकाळीं 'जोगेश्वरीला' जाऊं नको
जरी कोपली ती तुजवरती चिन्ता तुजला त्याचि नको

चतुःशृंगिला जाण्यासाठीं 'कम्प्यानियनहि'[1] शोधुं नको
आणि 'गालिचें' पहावयाला रात्रीं कोठें भटकूं नको
आरास बघण्या गणपतिची तू पुणें पालथें घालुं नको
गणपति सोडुनि 'सरस्वतींची'[2] केवळ शोभा पाहुं नको
'वेल-तुळशीबागें'त कधिं तूं सायंकाळीं जाऊं नको
देवावरची निश्चल भक्ति तिथें कुणाला दावुं नको
तिथें जंगली महाराज तो भांबुर्ड्याच्या जवळि असे
गुरुवारच्या सायंकाळीं त्याचें दर्शन योग्य नसे
श्रावण मासीं सोमवारच्या अगदीं प्रातः समयाला
शिवदर्शन तें घ्याया गर्दींत नको जाउं तू पर्वतिला
'हुजूरपागा' 'कन्याशाळा' 'सेवासदनहि' जें सुटतें
नको जाउं तूं पहावयाला कैसें नंदनवन फुलतें
'फर्ग्यूसन् हिल्' वरति फिराया जाया हरकत माझि नसे
सहज एकदां जरि ही गेलें पुनरपि जावें वाटतसें
दूरदूर अति दक्षिण भागीं लकडि पुलाच्या पलीकडे
एकलकोंडें रानामध्यें 'अबलांचें कॉलेज' रडे *
हवा मोकळी प्रशान्त जागा तिकडे फिरण्या कुणि जाती
'आहे माहित' म्हणुनी त्यांना अबला माना उडवीती
नव्या मनूंतिल सुशिक्षिता त्या 'अबला' सांगूं काय तुला
पुरुष जातिवरि हल्ला करण्या सदैव असती टपलेल्या
वैधव्याच्या ज्वाला लागुनि करपुनि गेलेल्या अबला
जनां लोटुनी दूर तयांनीं निवांत 'आश्रम' पतकरिला
त्यांना बघण्या तूं रविवारीं 'हिंगण्यास' कधिं जाउं नको
कोमल हृदयें जरी युक्त तूं विश्वचिन्ति तूं होउं नको

---

१ कोणताही !

२ सरस्वती या शब्दाचा अर्थ मर्यादित घेऊं नये.

* या शब्दाचा उपयोग शब्दसंपत्तीच्या अभावीं केलेला आहे हें चाणाक्ष वाचक ओळखतीलच आपद्धर्म नेहमींच क्षम्य असतो.

'वधू पाहिजे' जाहिराति या उगीच वाचुनि पाहुं नको
'मजा म्हणूनी' वधू पहाया जाउनि कोठें येउं नको



पुनर्विवाहा तयार विधवा
त्यांना केवळ बघण्याला
मीहि विवाहा तयार आहें न
सांगि लटकें कोणाला
सायंकाळीं नव्या पुलावर
कधिंही जाउनि वसूं नको
रस्ते सुंदर मोहक रचना
कॅम्पमधें तूं हिंडु नको
नवखी वस्ति नव नवलाई
'रास्तापेठे' मधीं असे

सांयकाळीं 'दाणेआळी'
( लाज वाटते बोलाया )
सहज म्हणूनी कधीं न जाई
तिकडें बाळा ! फिरावया
तिकडें फिरणें कुतूहलानें
विद्यार्थ्याला योग्य नसें
'मंडई'मध्यें सायंकाळीं
उगीच फेरी मारुं नको
घेणें नाहीं, देणें नाहीं
उगीच चौकशि करूं नको
'वंडगार्डन'हि फिरावयाला
जागा मोहक जरि वाटे
परंतु, असती तिथें पसरलें
सुंदर सुंदर अति कांटे



स्वागतार्थ त्या 'डेक्कन कीन'च्या रात्रिं आठला जाउं नको

'ब्यूटि' पहाया 'प्लॅट फॉर्म'वरि 'सूट' घालुनी फिरूं नको
स्टेशनजवळीं 'ससुन हॉस्पिटल' त्याच्या भोंवति फिरूं नको
शुभ्र पातळें नेसुनि फिरत्या तेथिल 'युवती' पाहुं नको
सायंकाळीं 'टिळक टॅन्कवर' पोहाया तूं जाउं नको
अपुली लीला 'कोणि' पाहि कां? नजर 'उत्तरें'[1] फेकुं नको
आज कुठें? तर स्वार गेटवर' अथवा 'एम्प्रेस गार्डनला'
'डेक्कन कॉलेज?' जाऊ उद्यांला परवां दिवशीं खडकीला
पश्चिमभागीं असे टेकडी तिकडें मार्गच ना उरला
चिन्ता नलगे! खडकवासलें, गणेशखिंडहि फिरण्याला
सायकलीसह नको फिरूं तूं ऐशा सायं समयाला
वेळ न पुरला, म्हणुनि अभ्यासाकडे तूं दुर्लक्ष्य करूं नको!
स्नेहाखातर दुसऱ्याच्या मग सायकली घेउनि फिरूं नको
दिवा न घेतां पोलिस चुकवुनि रात्रीं कधिंही धावूं नको
उगीच घंटा वाजवुनीया ऐट 'कुणाला'[2] दावुं नको
दोन मुलींच्या मधुनि सायकल हळुच देखिल नेउं नको
मध्यवस्तिमधिं जागा बघण्या भाड्याची तूं जाउं नको
'विद्यार्थी तुम्ही? जागा नाहीं' 'पुणेरि उत्तर' मिळवुं नको
'असभ्य' म्हणुनी शिक्का दिधला विद्यार्थ्यांना सभ्यांनीं
नकोच त्यांच्यामधें राहणें खुशाल राहीं तूं विपिनीं
अगणित गोष्टी सांगिन तुजला कंटाळा परि येईल
अनुभव येऊनि नव्या जगाचा तूंहि शहाणा होशील
आतां एकच ही शेवटची 'विनंति' करतों विसरुं नको
खर्च वाढवुनि पैशासाठीं रोज मागणी करूं नको.

— समाप्त —

---

१ उत्तर दिशेच्या रस्त्याकडे.

२ हा शब्द स्त्रीलिंगी आहे.

# अफूच्या गोळ्यांची डबी !

अफूचा उपयोग उद्दीपनाकडे जरी होत असला तरी पण शहाण्यांनीं तो तसा न करावा हेंच उत्तम ! अफू हा एक मादक पदार्थ असून, अडाणी व अशिक्षित स्त्रिया सांसारिककामांत व्यत्यय येऊं नये म्हणून आपापल्या "सोन्या-बच्याला" ती देत असतात; आणि त्या तंद्रींतच तीं मग खेळकर बनतात ! तरुण पणीं अफीमबाज बनलेली मंडळी, वृद्धपणीं चरसाच्या चिलमी झोकतात, म्हणजे यावरून अफू ही एक कमालीची उद्दिपक वस्तू आहे हे आपणासर्वांना बिन-तक्रारपण कबूल करावं लागतेंच !

पूर्वी इचि लागवड माळव्यांत करीत असत ! अफूचें बीं म्हणजे खसखस हें होय ! तेव्हां अफूचें सेवन न केलेला प्राणी सांप्रत आढळणें दुर्मिळच आहे ! अनार-शावरील खसखस "खुसखुशीत खंमग" म्हणून पचविण्याची प्रत्येकांना संवय, झालेलीच आहे ! अर्थात् ही "अफूच्या गोळयांची डबी" जरा बेतानेंच उघडून उपयोगांत आणा, असा धोक्याचा इषारा आम्ही वाचकांना नाहीं दिला तरी चालण्याजोगा आहे ! कारण, त्यामुळें एकादा प्राणी आत्महत्त्या करील अशी संभवनीय भीति प्रस्तुत गोळयांचे संग्राहक श्री. कवि मनमोहन यांना मुळींच वाटलेली दिसत नाहीं ! तर फाजील स्तुति ही मात्र त्यांना अस्सल कुसुंबाप्रमाणें प्राणहारक वाटली आणि म्हणूनच त्यांनीं विंडबनात्मक काव्याचा आश्रय घेऊन, या अफूच्या गोळया मुरारकवीप्रमाणें तृतीयपंथ स्वीकारून तयार केल्या ! तयार करतांना देखील कवि मनमोहन यांनीं इतकी खबरदारी घेतलेली दिसते कीं, "या गोळ्या सर्वच्यासर्व जरी एखाद्यानं गट्ट केल्या, तरी तो रंजिस न होतां, रंगांतच येण्याचा अधिक संभव वाटतो ! अगदीं सुतकी चेहऱ्याच्या चित्रानें जरी यांतील एखाददुसरी गोळी तोंडांत टाकून पाहिली, तरी तो देखील हंसूं लागेल, इतकें या गोळ्यांचें मादकत्व आल्हादकारी बनलेलें आहे ! याचें कारण म्हणजे त्यांनीं घेतलेलें विडंबनाचें आवरण हेंच होय ! विडंबनात्मक काव्याचा इतिहास हा फार पूरातन आहे ! त्यांत प्रच्छन्न टीकेचा मालमसाला घातल्याशिवाय, विनोदाची खुमारी विडंबनाला पूर्णत्व देत नसते ! आणि म्हणूनच एकनाथ वगैरे महाराष्ट्रीय साधुसंतांनीं आपापल्या प्रसादयुक्त वाणीनें या काव्याचा अवलंब केलेला दिसतो ! इंग्रजी वाङ्मयांतदेखील पो, डॅरिनोसारख्या कवींनीं

विंडबन काव्याचा आश्रय धरून, सुंदर काव्यें निर्माण केलेलीं आहेत! आणि हीच प्रथा आधुनिक प्रसिद्ध कवि, श्री. केशवकुमार यांनीं सुरूं केली असून, " झेंडूचीं फुलें " हा त्यांचा प्रास्तविक प्रयत्न सध्यां लोकविश्रुत झालेलाच आहे! त्यानंतर श्री. कवि मनमोहन यांचा हा दुसराच प्रयत्न लोकनिदर्शनास येत आहे–! आणि मला वाटतें कीं, हा श्री. केशवकुमारांच्यापेक्षां अधिक सरस असा झालेला आहे! " झेंडूच्या फुलांत " विडंबनात्मक भाग आहे–पण तो वस्तुस्थिती व व्यवहार याला न जुळणारा असा वाटतो! त्यांत रायनंदी थाट आहे! विडंबन करूं इच्छिणारा कवि, हा स्वतः उत्तम प्रासादिक कवि असलाच पाहिजे! अर्थात् या दृष्टीनें जर या अफूच्या गोळ्या हातांत घेऊन बारकाईनें पाहूं लागलों तर, " हीच रात्र करीं भूवरि अंधार कशाला–शृंगार नभाला! चंद्रासह रंगमहालांत शिरोनी–दे चुंबन राणी ॥ " या सारखी एखादी चुंबनीय गोळी देखील रसिक माणसाला तोंडांत टाकाविशी वाटते! म्हणजे यावरून उघडच होते कीं, श्री. कवि मनमोहन यांना विंडबन काव्याचे जनक म्हणून जगांत मिरवावयाचे नाहीं, तर त्याचा नुसतां आश्रय धरून नैतिकबाजूंची कास धरून कांहीं तरी लोकांचें चुकतें आहे, ते सुधारावें-अशी त्यांना अंतर्यामीची खरीखुरी तळमळ आहे! " वंचनेचा जोडा ", हा शालजोडीतला जरी असला तरी पण तो सोंवळा आहे! लागल्यावर पावित्र्याचाच भाग अंगी येईल! " मज नको ग आय्. सी. एस्. " ही कविता प्रो. मायदेवांच्या " मज हवा ग आय्. सी. एस्' या कवितेचे विडंबन स्वरूप न मानतां, एका आय्. सी. एस्च्या प्रेमळ पत्निचा तो एक करुण पण सत्य असा विलाप आहे!

सारांश, श्री० कवि मनमोहन यांचा हा अफूच्या गोळ्यांचा संग्रह मादक म्हणतां येणार नाहीं. तरी कृपा करून नुसत्या नांवावर कोणीहि झिंगून न जातां, उगीच नाहीं त्या निशेचा आंव आणून त्यांच्या नांवें " हस्तमुखप्रक्षालनविधि " करण्याची तसदी येऊं नये! कारण, त्यांना स्तुतिचें बरेंच वावडें असावें असें दिसतें! बिचारा यंग कवि देखील हेंच सांगतोः—The love of praise howe'er Concealed by art reigns more or less and glaws in every heart.

तारीख
२–११–३२

आपला,
**चि. ना. कोठीवाले, पुणें.**